ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.
Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172

**No,CGRF/AZ/U/177 / 2009 /11 /** **Date :-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer ,**
**O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

**Sub:- Forwarding of grievance in respect of Shri B.D Singri (User Dr.V.S.Badiger, Staff Quarters, Langarkhana, Bibi Ka Maqbara, Aurangabad.(Consumer No. 49001066028)**

**Dear Sir,**

**Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri B. D. Singri (User Dr.V.S.Badiger, Staff Quarters, Langarkhana, Bibi Ka Maqbara, Aurangabad.(Consumer No. 49001066028)**

**The consumer has requested the Forum to pass Interim order for reconnection of the supply.**

**The hearing on passing of Interim Order will be held on Tuesday 31st Jan.09 at 14.00 Hours.**

**You are requested to submit your reply at the time of hearing.**

**Encl: As above**

**Member/Secretary,**
**CGRF(AZ) MSEDCL**
**Aurangabad.**

**Copy to:-**
**Shri B.D Singri**
**(User Dr.V.S.Badiger,**
**Staff Quarters, Langarkhana,**
**Bibi Ka Maqbara,**
**Aurangabad.**

**BEFORE THE CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM AURANGABAD ZONE, AURANGABAD**

**( Case No. CGRF / AZ /AUR /U / 177 / 2008 / 11 )**

**B. D. Singri**
**Staff Qtrs. BiBi Ka Makbara**
**C/O Archaelogical Survey of India**
Aurangabad.
( Consumer No. 49001066028)

**Consumer Complainant.**

**V/s**

**MAHARASHTRA STATE ELECTRICITY DISTRIBUTION COMPNAY LTD. Urban Circle,Aurangabad.**

**The Distribution Licensee.**

**Date:- 31.01.2009**

**Sub**: Grievance under the Maharashtra Electricity Regulatory Commission, (Consumer Grievance Redressal Forum and Ombudsman) Regulations, 2006.

**INTERIM ORDER**

The consumer has filed his grievance in the Forum regarding wrong bills issued by the Distribution Licensee and also requested the Forum to pass an interim order directing the Distribution Licensee not to disconnect electricity supply of his residence on account of wrong bills issued by the D.L..

The grievance of the consumer was admitted as per Regulation No. 6.5 of Maharashtra Electricity Regulatory Commission The hearing on the application of the consumer for passing interim order was kept on 31.01.09.

On the date of hearing, i.e. on 31.01.09 , consumer representative Dr.V.S.Badiger present. Nodal officer was absent. On hearing the consumer we observe that since Dec.07 the bills issued are not as per meter reading. The past six months consumption record shown on the bill of Nov.08 was also found incorrect.

The Forum hereby direct the D.L. not to disconnect the electricity supply of the consumer till disposal of the grievance of the consumer.

Next hearing in the matter is kept on 3.2.09

| | | |
|---|---|---|
| **( H.A.Kapadia)** | **( P.A.Sagane)** | **(V.A.Hambire)** |
| **Member** | **Member Secretary** | **Chairman** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१७७/२००९/११**

**तक्रार दाखल दिनांक :- २९/०१/२००९**
**निकाल दिनांक :- २५/०३/२००९**

**श्री बी.डी.सिंगरी,**
**स्टाफ क्वाटर्स,लंगरखाना,**
**आर्कालाजी डिपार्टमेंट बिबिका मकबरा जवळ,**
**औरंगाबाद.**
**ग्राहक क्रमांक (४९००१०६६०२८) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**शहर मंडल औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २९/०१/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ३१/०१/२००९ रोजी ठेवण्यात आली.

अर्जदाराने मंचात दाखल केलेल्या तक्रारीचा सांराश खालील प्रमाणे आहे.

१) अर्जदार हे सरकारी सेवेत कार्यरत असुन ते औरंगाबाद येथील बीबीचा मकबरा येथील आर्कालॉजी विभागाच्या कर्मचारी निवासस्थानात राहतात. अर्जदार वापरत असलेले मीटर हे श्री बी.डी.शिंग्री यांच्या नांवाने आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार त्यांच्या कर्मचारी निवासस्थानातील मीटर हे असिंस्टट सुपरीटेंडींग आर्कालॉजीस्ट यांच्या नांवे बदल करुन देण्याबाबत अर्ज केलेला असुन त्यावर महावितरणतर्फे कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. अर्जदाराने दाखले केलेल्या तक्रारीनुसार ऑक्टोबर २००८ पासुन त्यांचे मीटर नादुरुस्त असुन त्यांना चुकीचे वाढीव बिल देण्यात येत आहे.या चुकीच्या वीज बिलाबाबत अर्जदाराने दिनांक ०५/११/२००८ रोजी उपकार्यकारी अभियंता,पॉवर हाऊस यांना पत्राव्दारे कळविले व सुधारीत वीज बिल देण्याची विनंती केली. पण त्यांच्या तक्रारीची मुदतीत दखल घेतली न गेल्यामुळे त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली असुन सुधारीत वीज बिल तसेच नांवात बदल़ करुन देण्याबाबत आदेश देण्याची विनंती अर्जदाराने मंचास केली आहे.त्याचप्रमाणे महावितरण कंपनीकडुन देण्यात येणा-या चुकीच्या वीज बिलापोटी वीज पुरवठा खंडीत करण्यात येवु नये असा अंतरिम आदेश पारीत करण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

२) दिनांक ३१/०१/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी श्री बी.एस बडीगर उपस्थित होते. महावितरणचे नोडल अधिकारी श्री जी.एस.राठौर उपस्थित होते. अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन महावितरणतर्फे त्यांना चुकीच्या वीज बिलाची आकारणी करण्यात आल्याचे

प्राथमीक निरिक्षणावरुन मंचास आढळुन आले. अर्जदाराच्या वीज पुरवठा त्यांनी दाखल केलेल्या तक्रारीचे निवारण होईपर्यत खंडीत करण्यात येवु नये असा अंतरिम आदेश पारीत करीत मंचाने या प्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक ०३/०२/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

३) दिनांक ०३/०२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी व महावितरणचे नोडल अधिकारी श्री जी.एस.राठौर उपस्थित होते.त्यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर आपला जवाब मंचात दाखल केला.अर्जदारास देण्यात आलेले वीज बिल चुकीचे असल्याचे मान्य करीत नोडल अधिकारी यांनी वीज बिल दुरुस्ती प्रस्ताव व सी.पी.एल.ची प्रत मंचात दाखल केली. मंचाने अर्जदारास वीज बिल दुरुस्ती नंतर देण्यात येण्या-या संभावित वीज बिलाची प्रत मंचात दाखल करण्याचे आदेश दिले तसेच अर्जदाराने नांवात बदल़ करण्याबाबत केलेल्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहीती पुढील सुनावणीच्या वेळी मंचात दाखल करण्याचे आदेश देत पुढील सुनावणी दिनांक १०/०२/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

४) दिनांक १०/०२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी तसेच नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी अर्जदारास देण्यात येणा-या वीज बिलाची प्रत मंचात दाखल केली. अर्जदाराने सध्या कार्यरत असलेले मीटर जलद गतीने फिरत असल्याबाबत मंचात तक्रार दाखल केली. अर्जदाराने मीटर चाचणीबाबत केलेली मागणी ही त्यांनी केलेल्या मुळ तक्रारीत नसल्यामुळे तसेच ही मागणी महावितरणकंपनीकडे आधी केलेली नसल्यामुळे ती नोडल अधिकारी यांच्या अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे करण्याबाबत अर्जदारास सुचीत करण्यात आले. दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर हे प्रकरण निकालासाठी ठेवण्यात आले.

५) मंचात दोन्ही बाजुकडुन दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रावरुन व मंचासमोर झालेल्या सुनावणीवरुन असे आढळुन येते की नोव्हेंबर २००७ पर्यंत अर्जदारास मीटर वरील नोंदीप्रमाणे वीज बिल आकारणी करण्यात येत होती डिसेंबर २००७ ते जुने मीटर बदली करेपर्यंत म्हणजेच ०४/११/२००८ पर्यंत महाविरणतर्फे अर्जदारास मीटर वीज वापराची नोंद करत असतांना देखील सरासरीवर आधारीत बिल देण्यात आले. जी चुकीची असल्याचे स्पष्ट होते.दिनांक ०४/११/२००८ रोजी जुने मीटर बदलतांना त्यावरील रिडींग २८०७९ अशी होती तर डिसेंबर २००७ मध्ये सि.पी.एल.प्रमाणे मागील रिडींग ही २४७७९ अशी असल्याचे दिसुन येते.यावरुन डिसेंबर २००७ ते ०४/११/२००८ पर्यंत अर्जदाराचा वीज वापर हा (२८०७९-२४७७९) ३३०० युनीट असा असल्याचे दिसुन येते.नोडल अधिकारी यानी दाखल केलेल्या वीज बिल रिव्हीजन प्रस्तावाचे निरिक्षण केल्यावर त्यांनी वरील काळासाठी बिल विभागुन देण्याची व अर्जदारास ७१६०/-रुपये क्रेडीट देण्याची तयारी दर्शविली मंचाने नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या वीज बिल रिव्हीजन प्रस्तावाचे निरीक्षण केल्यावर ते योग्य असल्याचे दिसुन येते.

वरील सर्व बाबीचे निरीक्षण केल्यावर मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरणतर्फे अर्जदारास डिसेंबर २००७ पासुन देण्यात आलेली सर्व वीज बिल रदद्‌ करण्यात येत आहे.

२) महावितरणतर्फे अर्जदारास डिसेंबर २००७ ते ०४/११/२००८ या काळातील वीज बिले ३० दिवसात विभागुन सुधारीत वीज बिल देण्यात यावे व सुधारीत वीज बिलात कोणतेही व्याज व दंड आकारण्यात येवु नये.

३) महावितरणतर्फे अर्जदारास ०४/११/२००८ पासुन पुढील काळातील वीज बिल मीटरवरील नोंदीप्रमाणे देण्यात यावे.

४) महाविरतण कंपनीने अर्जदाराने योग्य कागदपत्राची पुर्तता केल्यानंतर ग्राहकाच्या नांवात बदल करुन द्यावा.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१७७/२००९/११** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री बी.डी.सिंगरी,**
**स्टाफ क्वाटर्स,लंगरखाना,**
**आर्कालाजी डिपार्टमेंट बिबिका मकबरा जवळ,**
**औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१७७/२००९/११ )

आपण दिनांक २९/०१/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**